दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स

संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १८९ । बुधवार १५ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## चौकात आंबेडकर जयंती साजरी का केली म्हणत तरुणाला मारहाण

### निर्मलनगर परिसरात जुन्या वादातून घटना

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** जुन्या वादाच्या कारणावरून तसेच चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी का केली असे म्हणत एका तरुणाला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याची घटना तपोवन रोड परिसरात घडली. याप्रकरणी चौघांविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अक्षय शहाजी कांबळे (वय २७, रा. पाईपलाईन रोड) यांनी फिर्याद दिली असून ते बाउन्सर म्हणून काम करतात. दिनांक १४ एप्रिल रोजी रात्री सव्वानऊच्या सुमारास अक्षय हे त्यांचे मित्र आकाश सुपेकर आणि रोहित रोकडे यांच्यासोबत तपोवन रोडने जात असताना महाराष्ट्र बँकेसमोर सोमनाथ गिते, अशोक गिते, दीपक तांदळे (रा. भगवान बाबा चौक, निर्मलनगर) आणि पप्पू सायंबर (रा. पत्र्याची चाळ, निर्मलनगर) यांच्यासह इतर दोघांनी त्यांना अडवले.

आमच्या चौकात तू जयंती कशी काय साजरी केली? असे म्हणत आरोपींनी त्यांना दुचाकी अडवून हातातील लाकडी दांडक्याने अक्षय यांच्या पाठीवर, छातीवर आणि खांद्यावर गंभीर मारहाण केली. तसेच तुला कुठे जायचे ते जा अशी धमकी दिल्याचे तसेच झटापटीत फिर्यादीची सोन्याची चेन तुटून पडल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे.

### घरी जाऊन कुटुंबाला शिवीगाळ

**हल्ल्यापूर्वी आरोपींनी अक्षय यांच्या घरी जाऊन त्यांची पत्नी, वडील, आई आणि आजी यांना शिवीगाळ केली होती. अक्षय आणि त्यांचा भाऊ वैभव घरी न मिळाल्याने आरोपी त्यांना शोधत तपोवन रोडवर पोहोचले, असेही फिर्यादीत नमूद आहे.**

### नवरा-बायकोच्या भांडणात खावडी खाणे अंगलट

## तोफखान्याचा पोलीसदादा लाच लुचपतच्या सापळ्यात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नवरा-बायकोच्या भांडणात तपासात सहकार्य करण्यासाठी तीस हजारांची लाच घेतल्याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्याच्या पोलीस कर्मचाऱ्यावर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली. आज, बुधवारी दुपारी उशिरा झालेल्या या कारवाईने खळबळ उडाली असून, सायंकाळी उशिरापर्यंत पुढील कायदेशीर प्रक्रिया चालू होती.



तोफखाना पोलीस ठाण्यात पती-पत्नीच्या घरगुती भांडणासंदर्भात घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम कलम ४९८ नुसार गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यात फिर्यादी व सामनेवाला यांच्या पोलीस ठाण्यामध्ये चकरा सुरू असताना तपासात सहकार्य करण्याच्या बदल्यात तोफखान्याच्या पोलिसाने संबंधित एका व्यक्तीकडे तीस हजार रुपयांची लाच मागितली. आज दुपारी त्याला लासलुचपत प्रतिबंधक विभागाकडून लाच घेताना रंगेहाथ जाळ्यात पकडण्यात आले. या कारवाईने पोलीस वर्तुळात खळबळ उडाली असून पोलीस दादांच्या वाढत चाललेल्या खावडीचा मुद्दाही चर्चेत आला आहे.

## पैठणमध्ये दोन गटांत तुफान हाणामारी; खाटीक वाडा परिसरात तणावाचे वातावरण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** शहरातील खाटीक वाडा, नेहरू चौक परिसरात कुरेशी समाजातील दोन गटांमध्ये आज सकाळी ९०च्या सुमारास जोरदार हाणामारी झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, जुन्या वादातून हा संघर्ष उफाळून आला. दोन्ही गटातील व्यक्तींमध्ये ■ पान ४ वर

## शेअर बाजारात उसळी, गुंतवणूकदार मालामाल

**मुंबई । वृत्तसंस्था –** अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष कमी होण्याची चिन्ह निर्माण झाल्याने आणि क्रूड ऑईलच्या दरात घसरण होऊन ते ९५ डॉलर प्रति बॅरॅलवर आले. याचा परिणाम जगभरातील शेअर बाजारांमध्ये पाहायला मिळत आहे. भारतीय शेअर बाजारात आयटी, रिअल्टी, कंझ्युमर ड्युरेबल्स, ऑईल अँड गॅस आणि केमिकल्स सेक्टर्सला आधार मिळाल्यानं त्यात तेजी पाहायला मिळाली. भारतीय शेअर बाजारात बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचे १३ एप्रिलला बाजारमूल्य ४४९ लाख कोटींवर होतं. आज १५ एप्रिलला बाजार बंद झाला तेव्हा बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजामूल्य ४५८ लाख कोटींवर पोहोचलै आहे. ■ पान ४ वर

## पैठण-शेवगाव मार्गावरील 'ब्लॅक स्पॉट'वर प्रशासनाची नजर; अपघात रोखण्यासाठी संयुक्त पाहणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** पैठण ते शेवगाव रस्त्यावर गेल्या काही दिवसांत वाढलेल्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने आज संयुक्तपणे 'ब्लॅक स्पॉट'ची पाहणी केली. प्रवाशांचा सुरक्षित प्रवास सुनिश्चित करण्यासाठी आणि अपघातांवर आळा घालण्यासाठी ही मोहीम राबवण्यात आली.

या पाहणीवेळी पोलीस निरीक्षक गोमारे, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक आनंद झोटे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता श्री. शिंदे तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

धोकादायक ठिकाणांची पाहणी प्रशासकीय ■ पान ४ वर



## स्व. सुवालालजी गुंदेचा यांची शिस्तबद्ध कारभाराची शिकवण कायम दिशादर्शक - अभय पितळे

### जैन ओसवाल पतसंस्थेत स्व. सुवालालजी गुंदेचा यांना जयंतीनिमित्त अभिवादन




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सहकाराचा जिल्हा अशी ओळख असलेल्या अहिल्या नगर जिल्ह्यात अनेक दिग्गजांनी सहकाराची पाळेमुळे घट्ट रूजवून मोठे परिवर्तन घडवले. यात सहकार महर्षी स्व. सुवालालजी गुंदेचा यांचे नाव अग्रस्थानी आहे. सहकारी बँकिंगचा गाढा अभ्यास असलेल्या गुंदेचा यांनी सहकारी आर्थिक संस्थांच्यापतस माध्यमातून सर्वसामान्यांना तसेच छोट्या व्यावसायिकांना आर्थिक पत देऊन त्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य आणण्यात योगदान दिले. शिस्तबद्ध आणि विश्वासार्ह कारभार करून आर्थिक संस्था उत्तमरीत्या कशी चालवायची हे त्यांनी जैन ओसवाल पतसंस्थेच्या माध्यमातून दाखवून दिले. त्यांनी स्थापन केलेल्या ही पतसंस्था रौप्य महोत्सव साजरा करीत आहे. सुवालालजी गुंदेचा आज हयात नसले तरी त्यांचे विचार आणि आदर्श आजही दिशादर्शक आहेत. त्यामुळेच पतसंस्था कायम प्रगतीच्या राजमार्गावर वाटचाल करीत आहे, असे प्रतिपादन सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे चेअरमन अभय पितळे यांनी केले.

सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या वतीने स्व. सुवालालजी गुंदेचा यांच्या ९२ व्या जन्म जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी चेअरमन अभय पितळे बोलत होते. याप्रसंगी संचालक संतोष गांधी, मनोज गुंदेचा, चेतन भंडारी, शरद गोयल, व्यवस्थापक प्रशांत भंडारी, ज्येष्ठ सभासद राजेंद्र चोपडा, राजेंद्र गांधी, संजय बोरा, दिनेश फिरोदिया, सुनील गांधी, नरेंद्र कोठारी. सौ. उज्वला दारूणकर, सौ. पवार, सर्व बचत प्रतिनिधी, सभासद उपस्थित होते.

चेअरमन अभय पितळे पुढे म्हणाले, स्व. सुवालालजी गुंदेचा यांनी सुरूवातीपासूनच शिस्तबद्ध कारभार करण्यावर भर दिला. त्यामुळे संस्थेने स्पर्धेच्या युगातही अतिशय चांगली वाटचाल करीत मोठी प्रगती केली. पतसंस्थेने स्थापनेपासून सभासदांना १५ टक्के लाभांश दिला आहे. ऑडिट अ वर्ग कायम राखला आहे. सुरूवातीपासून कायम नफा मिळवण्याची कामगिरी पतसंस्थेने केली आहे.

यावेळी संचालक संतोष गांधी, मनोज गुंदेचा, ज्येष्ठ सभासद राजेंद्र चोपडा, राजेंद्र गांधी यांनी स्व.सुवालालजी गुंदेचा यांच्या प्रतिमेस अभिवादन करून मनोगत व्यक्त केले.

आर्शिवाद

तुमचा प्रेमळ सहवास आमचा उत्साह वाढवितो
तुमच्या कौतुकाची थाप आमचा हुरूप वाढवितो
असेच कायम राहवे ही 'स्वामींचरणी'आमची इच्छा
आपुल्या जन्मदिनी आमुच्या लाख लाख शुभेच्छा
तुम्ही दीर्घायूषी व्हावे, तुम्ही निरंतर प्रसन्न राहवे
तुमच्या यशाचे पोवाडे आम्ही नित्य गातच राहवे

मा. श्री. जालिंदर शिंदे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक अभिनंदन
-शुभेच्छुक-
जालिंदर शिंदे मित्र मंडळ, पाईपलाईन रोड, अहिल्यानगर

## दै. आकर्षण निवडक

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

शेवगाव - पाथर्डी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने पाथर्डी शहरातील कोरडगाव चौकातील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर याच्या पुतळ्यास सालाबादप्रमाणे पुष्पहार घालून अभिवादन केले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात करत जयंती साजरी केली....! यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कामगार आघाडी चे जिल्हाध्यक्ष किरण पालवे , राष्ट्रवादी काँग्रेसचे पार्टी चे मा.तालुका अध्यक्ष बाळासाहेब दराडे,मा.नगरसेवक चांदभाई मनियार , कारेगाव सोसायटी चे चेअरमन प्रविणजी , शुभम गर्जे , कदीर शेख, गणेश आंधळे ,मा.नायब तहसिलदार भाऊसाहेब डोईफोडे ,बाबा गाडे सह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

### हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने फुले-आंबेडकर जयंती स्वच्छता, वृक्षारोपण



अहिल्यानगर - हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान, वृक्षारोपण आणि सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. सामाजिक जाणीव आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमातून एका गरजू मुलीच्या उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत देऊन जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यावेळी संजय भिंगारदिवे व दीपक अमृत यांनी त्रिशरण आणि पंचशील घेतले. यानंतर डॉ. दमन काशीद व डॉ. गायत्री काशीद यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. ग्रुपच्या सदस्यांनी उद्यान परिसरात स्वच्छता करत पर्यावरणाबाबत जागरूकतेचा संदेश दिला. महापुरुषांच्या विचारांना वंदन करुन मुलीच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने होतकरू विद्यार्थिनी गौरी बाळासाहेब नेटके हिला बी.ए. एम.एस. अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक मदत देण्यात आली.

### गाव नमुना ७अ व ७ब हटवण्याची प्रक्रिया बेकायदेशीर

अहिल्यानगर- महाराष्ट्रातील महसूल व्यवस्थेत दीर्घकाळ सुरू असलेल्या वादग्रस्त आणि अन्यायकारक पद्धतीवर अखेर न्यायालयाने हस्तक्षेप करत ऐतिहासिक निर्णय दिला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने गाव नमुना ७अ व ७ब हटवण्याची प्रक्रिया बेकायदेशीर ठरवत शेतकऱ्यांच्या हक्कांना पुन्हा अधोरेखित केले असल्याची माहिती ॲड. अमोल के. गवळी यांनी दिली.दि. २३ मार्च रोजी न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी आणि वैशाली पाटील-जाधव यांच्या खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार, गाव नमुना ७अ व ७ब पुन्हा महसूल अभिलेखात समाविष्ट करणे बंधनकारक ठरवण्यात आले आहे. या निर्णयामुळे प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांचे नाव पुन्हा अधिकृत नोंदीत येणार असून, त्यांच्या अस्तित्वाला कायदेशीर मान्यता मिळणार आहे. न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, ही केवळ प्रशासकीय चूक नसून शेतकऱ्यांच्या मूलभूत हक्कांवर आघात आहे.७/१२ उताऱ्यांचे संगणकीकरण करताना गाव नमुना ७अ व ७ब मुद्दाम वगळण्यात आल्याचा गंभीर आरोप या प्रकरणात समोर आला. यामुळे मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला. प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्यांचे नाव नोंदीतून गायब, ‘‘खुद्द’’ व ‘‘कुळ’’ यांची ओळख नष्ट, भूमाफियांना जमीन बळकावण्यासाठी संधी, खऱ्या शेतकऱ्यांना सरकारी योजनांपासून वंचित ठेवण्याचा मार्ग या प्रकाराला न्यायालयाने ‘‘तांत्रिक त्रुटी’’ मानण्यास नकार देत तो शेतकऱ्यांच्या अस्तित्वावरचा थेट हल्ला असल्याचे स्पष्ट केले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण,संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीचा पुरस्कार केला - डॉ. अनिल ससाणे

**निर्मलनगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राला दिलेली सर्वात मोठी देणगी म्हणजे संविधान त्यांनी अत्यंत सखोल अभ्यास दूरदृष्टी आणि राष्ट्रहिताच्या दृष्टीने ही राज्यघटना घडवली. या संविधानामुळे भारत केवळ स्वतंत्र राष्ट्र राहिला नाही तर एक शशक्त, संघीय आणि सार्वभौम देश म्हणून जगासमोर उभा राहिला.डॉ. आंबेडकरांनी शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीचा पुरस्कार केला. त्यांनी शिक्षणाला वैयक्तिक उन्नती पुरते मर्यादित न ठेवता सामाजिक परिवर्तन आणि राष्ट्र निर्मितीचे प्रभावी साधन मानले.असे प्रतिपादन डॉ. अनिल ससाणे यांनी केले.

सावेडी उपनगरातील निर्मल नगर येथे निर्माण नगर परिसर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक यांच्यावतीने जयंती साजरी करण्यात आली यावेळी बुद्ध वंदना व भिम वंदना भाऊसाहेब देठे यांनी गायन केले.

याप्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी अनिल मोहिते, बाबासाहेब सानप, रवी अनासपुरे, नगरसेवक निखिल वारे, सुनील त्र्यंबके, बाळासाहेब पवार, महेश तवले प्रकाश भिंगारदिवे सुशील साळवे, विकास खरात, छगन आल्हाट वैभव पोकळे, उषा साळवे,शांताबाई काळे, जयश्री साळवे, शेखर काते, संघर्ष पाचारणे, प्रा.विश्वास कांबळे एम.बी. साळवे, एस.के. गायकवाड,अरविंद औसरमल, शशिकांत घोडके, डॉ. संगीता खंडागळे, कल्पना कांबळे, डॉ. सविता ससाणे, नलिनी गायकवाड आदींसह भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रा.विश्वास कांबळे म्हणाले भारत जेव्हा महासत्तेकडे वाटचाल करत आहे तेव्हा या प्रवासा मागे असलेली वैचारिक शक्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातच दडलेली आहे. त्यांनी दिलेली राज्यघटना समाजाला दिलेली समतेची दिशा आणि बौद्ध धम्माच्या माध्यमातून दिलेल्या नैतिक अधिकार यामुळे भारताला खरे सार्वभौमत्व प्राप्त झाले आहे. यावेळी अनिल मोहिते, एम.बी.साळवे यांनी देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची माहिती दिली.

## ‘विद्येविना मती गेली’ हा संदेश केवळ काव्य नसून, प्रगतीचा मूलमंत्र – डॉ. पारस कोठारी

**भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये शिक्षण प्रसार जनजागृती अभियानाचा शुभारंभ**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शहरातील हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी विशेष जनजागृती अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या अभियानाच्या माध्यमातून विविध कारणांनी अर्धवट शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत रात्र शाळेत पुन्हा प्रवेश देण्यावर भर देण्यात येणार असून, आजी–माजी विद्यार्थी व शिक्षक ‘शिक्षणदूत’ म्हणून सक्रिय भूमिका बजावणार आहेत. समाजातील उपेक्षित व शिक्षणापासून वंचित घटकांपर्यंत पोहोचून त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. हा मान रात्र शाळेच्या चेअरमन ज्योतीताई कुलकर्णी व पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या हस्ते पार पडला. यावेळी प्राचार्य सुनिल सुसरे, महादेव राऊत, अमोल कदम, उज्वला साठे,वृषाली, साताळकर, अनुराधा दरेकर, वैशाली दुराफे, बाळासाहेब गोरडे, शिवा शिंदे, कैलास करांडे, गजेंद्र गाडगीळ, मंगेश भुते, अशोक शिंदे, प्रशांत शिंदे, स्वाती होले, अनिरुद्ध देशमुख, अनिरुद्ध कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, अविनाश गवळी, मनोज कोंडेजकर, कैलास बालटे, आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमात महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षिका स्वाती किशोर अहिरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्या अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या श्री नवनाथ विद्यालय, करंजी (ता. पाथर्डी) येथे कार्यरत आहेत.

ज्योतीताई कुलकर्णी म्हणाल्या की, पूर्वी महिला घरात कोंडलेली बाहुली होती. महात्मा फुले यांनी तिला शिक्षणाच्या माध्यमातून समाजात सन्मान मिळवून दिला. महिलांवर लादलेल्या अन्यायकारक रुढी आणि परंपरा त्यांनी शिक्षणाच्या बळावर दूर केल्या. स्वतःच्या पत्नीला सुशिक्षित करून त्यांनी स्त्री शिक्षणाची पायाभरणी केली. ‘स्त्री शिकली तर समाज घडतो’ हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले. ज्योतिबांचे ऋण कधीही फेडता येणार नसल्याचे त्या म्हणाल्या.

डॉ. पारस कोठारी म्हणाले की, महात्मा फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजमनातील अंधकार दूर केला. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचा प्रारंभ हा ज्ञान, समता आणि मानवी हक्कांच्या लढ्याला मिळालेले मोठे यश आहे. ‘विद्येविना मती गेली’ हा त्यांचा संदेश केवळ काव्य नसून प्रगतीचा मूलमंत्र आहे. हिंद सेवा मंडळ त्यांच्या विचारांवर चालत असून, नाईट हायस्कूलच्या माध्यमातून समाजातील उपेक्षित घटकांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देत आहे. शिक्षण देऊनच थांबणार नाही, तर त्यांना समाजात सक्षमपणे उभे करण्याचे कामही केले जात आहे.’’

जिल्हा परिषद शिक्षण विभाग व महानगरपालिका शिक्षण मंडळ यांच्या मार्गदर्शनाने गेली दोन वर्ष सतत या अभियानांतर्गत तीन गटांमध्ये स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे: पहिला गट: शिक्षणदूत म्हणून जबाबदारी स्वीकारलेल्या आजी माजी विद्यार्थी, दुसरा गट: वर्गशिक्षकांचा, जे आपल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून जास्तीत जास्त प्रवेश मिळवून देतील, तिसरा गट: शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, जे वैयक्तिक संपर्कातून जनजागृती करतील. या तिन्ही गटांमधून रात्रशाळेत सर्वाधिक परिपूर्ण प्रवेश मिळवून देणाऱ्या पहिल्या तीन क्रमांकाच्या व्यक्तींना ट्रॉफी व सन्मानपत्र देण्यात येणार आहे व या स्पर्धेदरम्यान समाजातील सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, वकील हे देखील सामाजिक जबाबदारी स्वीकारून शिक्षण प्रसार जनजागृती अभियान अंतर्गत रात्रशाळेत गरजवंत विद्यार्थ्यांचा किमान एक प्रवेश करणाऱ्या मान्यवरांना सन्मानपत्र देण्यात येणार असल्याची माहिती प्राचार्य सुनिल सुसरे यांनी दिली. विशेष शालेय शिक्षण विभागाने रात्र शाळेतील इयत्ता अकरावी प्रवेश ऑफलाइन पद्धतीने ठेवल्याने गरजवंतांनी तात्काळ आपला प्रवेश निश्चित करण्याचे म्हटले आहे.

## भोंदूगिरी करणाऱ्या अशोक खरातच्या प्रतिकात्मक पुतळ्यास शेणाचे लाडू खाऊ घालून जोडे मारले



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरात पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने भविष्य सांगण्याच्या नावाखाली भोंदूगिरी करणाऱ्या अशोक खरात च्या निषेधार्थ तीव्र आंदोलन करण्यात आले. हुतात्मा स्मारक येथे पार पडलेल्या या आंदोलनात ‘‘सूर्यसाक्षी शेण लाडू अभियान’’ राबवत भोंदूगिरीचा निषेध नोंदवण्यात आला. खरातच्या प्रतिकात्मक पुतळ्यास शेणाचे लाडू खाऊ घालून जोडे मारण्यात आले.

आंदोलनाची सुरुवात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तसेच छत्रपती चौथे शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळी अभिवादन करून करण्यात आली. यावेळी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, वीर बहादुर प्रजापती, ओम कदम, पोपट शेळके, अशोक भोसले

यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

या आंदोलनादरम्यान अशोक खरात याच्या भोंदूगिरीचा तीव्र निषेध करण्यात आला. तसेच त्याच्या संपर्कात असलेल्या मंत्री, आमदार आणि कथित भोंदू समर्थकांवरही टीका करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी राज्यात अंधश्रद्धा पसरवणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करावी व अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली.

‘‘सूर्यसाक्षी शेण लाडू अभियान’’ हे केवळ निषेध आंदोलन नसून समाजातील चुकीच्या समजुतींवर थेट प्रहार करणारा एक सामाजिक प्रयोग असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. ‘‘शेण लाडू’’ हे प्रतीक वापरून शुद्ध–अशुद्ध या पारंपरिक संकल्पनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले.

‘‘स्वच्छ भारतानंतर आता स्वच्छ मन’’ ही संकल्पना मांडत, समाजातील अंधश्रद्धा, जातीयता, स्त्रीदास्य व मतदारदास्य या अमानवी विचारसरणी बदलण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

## चौथी हा शालेय जीवनातील महत्त्वपूर्ण टप्पा – सौ.रोहिणी फळे

**दादा चौधरी मराठी शाळेत चौथीच्या विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ उत्साहात**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पहिले ते चौथी शाळेतील सर्व शिक्षकांनी तुम्हाला घडविण्यासाठी शाळेत अनेक उपक्रम राबविले आहेत. चौथीनंतर विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून आई-वडिलांच्या व शाळेच्या नावलौकिकात भर घालावी.मोबाईल पासून दूर राहावे,पालकांना मोबाईल घेण्याचा हट्ट धरू नये.तसेच शालेय जीवनात मिळालेल्या शिक्षणाच्या शिदोरीवर आपली प्रगती साधावी.चौथी हा शालेय जीवनातील महत्त्वपूर्ण टप्पा आहे.असे प्रतिपादन श्रीमती पार्वती डहाणूकर कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. रोहिणी फळे यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी मराठी शाळेत इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले.याप्रसंगी इ.४ थीच्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी नगर शहरातील अंगणवाडी प्रमुख सुरेखा नवले, अंगणवाडी सेविका सविता चिलवर,सौ.आशा कुमटकर, अनिता रोहोकले,शोभा तरोटे,कल्पना पेशवे, दिशा केदारे, अनुराधा पाडळे, कल्याणी तनपुरे, शारदा बिज्जा,रेखा माहुले,श्रीमती आडेप मॅडम,बालभवन च्या सौ.शिंदे,पा.ड.क. वि.विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.रोहिणी फळे,दादा चौधरी विद्यालयाचे मुख्याध्यापिका जयश्री नन्नवरे,मराठी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष येवले,ज्येष्ठ शिक्षक दिलीप परसपाटकी उपस्थित होते.

सुरेखा नवले म्हणाले,शाळेतील विद्यार्थ्यांची प्रगती कौतुकास्पद आहे.इयत्ता पहिली ते चौथी हा शालेय जीवनातील महत्त्वाचा टप्पा असून विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन प्रगती करावी.

**प्रास्ताविकात मुख्याध्यापक सुभाष येवले** म्हणाले,शाळेचे चेअरमन सुमतीलाल कोठारी यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक शिक्षण मिळावे. मुलांनी हसत खेळत शिक्षण घ्यावे यासाठी विविध उपक्रम घेतले जातात.दादा चौधरी मराठी शाळेत पायाभूत शिक्षणावर भर दिला आहे.विद्यार्थ्यांना इयत्ता पहिलीपासूनच चांगले संस्कार करून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिल्यास त्यांचा पाया पक्का होतो.व जीवनात त्यांची प्रगती होते. ज्यावेळेस एखादा विद्यार्थी जीवनात यशस्वी होतो त्यावेळेस त्यांचे शिक्षक व संस्थेचे पदाधिकारी यांना आनंद होत असतो. या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमात अंगणवाडी संचालिकांचा शैक्षणिक कार्याबद्दल सन्मान करण्यात आला.

## गणेशनगर येथे थोर समाज सुधारक महात्मा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी

**महात्मा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या थोर महापुरुषांच्या विचारानेच देशात क्रांती – गणेश शिंदे**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** क्रांतीसुर्य महात्मा फुले यांनी सर्व समाजाला शिक्षणाचे द्वारे खुली केली.मानवता हाच खरा धर्म आहे.एक स्त्री शिकली तर सर्व कुटुंब शिक्षित होते. हे सांगून स्त्री शिक्षणाचा पाया महात्मा फुले यांनी रोवला.तसेच महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य,समता आणि बंधुता ही त्रिसूत्रे समाजाला दिली.भारताच्या आदर्श राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.आंबेडकर यांनी आदर्श संविधानाचे लेखन करून देशाची लोकशाही मजबूत केली.महात्मा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या थोर महापुरुषांच्या विचारानेच देशात समतेची क्रांती निर्माण झाली आहे.असे प्रतिपादन भृंग महारुषी सोसायटीचे चेअरमन गणेश शिंदे यांनी केले आहे.

कल्याण रोड येथील गणेश नगर येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सयुक्तिक जयंती साजरी करण्यात आली.याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी गणेशनगर परिसरातील विमलताई जगताप,शिला गायकवाड, प्रमिलाताई शिंदे,समीक्षा शिंदे,आकांशा शिंदे,सुनिता जगताप, विशाखा जगताप, प्रतिक्षा जगताप,गायत्री थोरात भृंगमहाऋषी सोसायटीचे चेअरमन गणेश शिंदे, शंकर गायकवाड, नानासाहेब देवतरसे, पत्रकार अमोल भांबरकर,सहदेव जगताप,राजकुमार शिंदे, संभाजी गरड, सुधीर जगताप, राजू तेल्ला,अनिल राऊत,आदेश गायकवाड,प्रतिक जगताप,मेजर प्रशांत बोरुडे, कमलेश गाजुल, अमित खरारे, अथर्व भांबरकर, योगीराज भांबरकर आदींसह गणेशनगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फ्रेंड्स कॉर्पोरेट क्रिकेट लीगमध्ये नगर चॅम्पियन व नगर डिस्ट्रिक्ट सिनिअर्सचा विजय

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** रविवार दिनांक १२ एप्रिल रोजी झालेल्या फ्रेंड्स कॉर्पोरेट क्रिकेट लीगमधील सामन्यांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली. पहिल्या सामन्यात शिवराज ॲडव्होकेट वॉरियर्स आणि नगर चॅम्पियन यांच्यात रंगलेल्या सामन्यात नगर चॅम्पियन संघाने थरारक विजय मिळवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना शिवराज ॲडव्होकेट वॉरियर्स संघाने दमदार फलंदाजी करत ४ गड्यांच्या मोबदल्यात १६८ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात नगर चॅम्पियन संघाने संयमी व आक्रमक खेळ करत ८ गड्यांच्या मोबदल्यात १७१ धावा पूर्ण केल्या आणि सामना आपल्या नावावर केला. या सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संजू आल्हाट याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

दुसऱ्या सामन्यात नगर डिस्ट्रिक्ट सिनिअर्स अहिल्यानगर संघाने प्रथम फलंदाजी करताना ६ गड्यांच्या मोबदल्यात १५४ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना ए बी ॲक्ट अहिल्यानगर संघाला चांगली सुरुवात मिळाली नाही आणि संपूर्ण संघ १० बाद १३१ धावांवरच मर्यादित राहिला. परिणामी नगर डिस्ट्रिक्ट सिनिअर्स संघाने हा सामना जिंकत आपली ताकद सिद्ध केली. या सामन्यात तेजस करमरकर याने सर्वोत्कृष्ट खेळ करत सामनावीर किताब पटकावला.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### केडगावच्या गायत्री क्षीरसागर यांना पीएचडी प्रदान



अहिल्यानगर - केडगाव येथील गायत्री मुंजाजी पांचाळ (गायत्री महेश क्षीरसागर) यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने हिंदी विषयात आचार्य (पीएचडी) पदवी प्रदान केली आहे. त्यांनी 'रामचरितमानस एवं भावार्थ रामायण का तुलनात्मक अध्ययन' या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला. संशोधनासाठी पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालयाच्या हिंदी विभागाध्यक्षा डॉ. अपर्णा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे संशोधन पूर्ण केले, तसेच विद्यापीठाचे हिंदी विभाग अध्यक्ष डॉ. संजय राठोड, डॉ. अशोक देशमाने व डॉ. सर्जेराव जिगे सर यांचे विशेष सहकार्य लाभले. गायत्री यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

### स्नेहबंधतर्फे आकाशवाणी केंद्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



अहिल्यानगर - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी अहिल्यानगर येथील आकाशवाणी केंद्रात अभिवादन केले. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमांचेही पूजन करण्यात आले. या प्रसंगी आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी मुजम्मिल पटेल, कार्यक्रम अधिकारी सुदाम बटुळे, ललिता कात्रे, माजी मुख्याध्यापक एकनाथ जगताप, शिल्पकार बालाजी वल्लाल तसेच विशाल पेन्ट्सचे संचालक हरिष भागवाणी आदी उपस्थित होते.

### वेतन विलंबामुळे शिक्षकांमध्ये संतापाची लाट; दोन दिवसांत तोडगा न निघाल्यास आंदोलनाचा इशारा

अहिल्यानगर - शालार्थ प्रणालीतील तांत्रिक अडचणींचा दाखला देत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन वारंवार विलंबाने दिले जात असल्याने जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. यासंदर्भात शिक्षक भारती संघटनेच्या वतीने माननीय शिक्षण उपसंचालक यांना निवेदन देण्यात आले असून, तात्काळ वेतन वितरण करण्याची मागणी करण्यात आली आहे. फेब्रुवारी २०२६ महिन्याचे वेतन १३ मार्चनंतर वितरित करण्यात आले, तर मार्च महिन्याचे वेतन बिल अद्यापही मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः गृहकर्जाचे हप्ते वेळेवर न भरल्याने दंडाचा भुर्दंड सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे. शिक्षण विभागाकडून कागदपत्रांचे डिजिटायझेशन, ई-केवायसी प्रक्रिया, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन, मंजूर पदांच्या मर्यादा आदी कारणे देत वेतन प्रलंबित ठेवण्यात येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र या तांत्रिक प्रक्रियांना पूर्णत्वास नेण्यासाठी किमान पाच ते सहा महिने लागण्याची शक्यता असून, तोपर्यंत शिक्षकांना वेतनापासून वंचित ठेवणे अन्यायकारक असल्याचे संघटनेचे नेते व शिक्षक भरतीचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी सांगितले विशेषतः शून्य शिक्षकी शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन थांबवण्यात आले असले, तरी त्या शाळांमध्ये अध्यापन सुरू असून, परीक्षा व मूल्यमापनाची कामे सुरू आहेत.

# महालक्ष्मी मित्र मंडळाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

## पुतळ्यास पुष्पहार अर्पण; जयघोषात अभिवादन



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कल्याण रोडवरील महालक्ष्मी मित्र मंडळाच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परिसरात ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमर राहो'' चा जयघोष घुमत उत्साही वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमाला ॲड. युवराज शिंदे, ज्येष्ठ वकील सुरेश लगड, कुंडलिक आरवडे, लक्ष्मण खोडदे, भास्कर तावरे, सुधाकर बोल्ली, सचिन बुरा, राजू पाडळे, ऋषिकेश तिखे, शेषराव आगळे, शंकर डुकरे, गणेश बेरड, अरुण ढाकणे, अशोक जाधव, सुनील राऊत, सोनटक्के सर आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना ॲड. युवराज शिंदे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला न्याय, समता आणि बंधुतेचे अधिकार मिळवून दिले. या हक्कांसाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. ''शिका आणि संघटित व्हा'' हा त्यांचा संदेश समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा असून आजही तितकाच प्रेरणादायी आहे.

ते पुढे म्हणाले की, शिक्षणाच्या माध्यमातूनच समाजाची उन्नती शक्य आहे. डॉ. आंबेडकर यांनी दिलेल्या विचारांमुळे आजचा युवक सशक्त होत असून त्यांच्या विचारांतूनच पुढील पिढीला ऊर्जा आणि दिशा मिळत आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा जयघोष करत अभिवादन केले. या उपक्रमामुळे परिसरात सामाजिक जागरूकतेचा संदेश देत जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

# जेसीपीआरच्या विद्यार्थ्यांचे दुसरे स्नेह संमेलन संपन्न



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**


**अहिल्यानगर–** नगर महाविद्यालयातील जर्नालिझम (जेसिपिआर) च्या पहिल्या बँचच्या विद्यार्थ्यांचे गेटटुगेदरचा दुसरा कार्यक्रम नुकताच प्रकाशजीत व सुषमा अमर यांच्या भिंगाररोडवरील निवासस्थानी येथे पार पडला.

यावेळी उर्दू कवी निजामभाई जहागिरदार यांच्या शेरशायरीने कार्यक्रमात रंगत चढली.नगरमधील प्रसिद्ध पुस्तक विक्रेते दत्ताभाऊ परभणे, ज्येष्ठ पत्रकार कैलास ढोले यांनी विचार व्यक्त केले.यावेळी प्रकाशजीत व सुषमा यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमानंतर स्नेह भोजन देण्यात आले.

कार्यक्रमास जिल्हा बँकेचे जनरल मॅनेंजर सुरेश पाटील, उद्योजक अविनाश कुलकर्णी,मेजर कुलदीपसिंग, महापालिकेचे निवृत्त अधिकारी दिगंबर कोंडा, प्रा.अविनाश दंडवते,ज्येष्ठ पत्रकार शकूर शेख, बाजीराव खांदवे, वृत्तपत्र फोटोग्राफर देवीप्रसाद अय्यंगार, सुस्मिता अय्यंगार आदी उपस्थित होते.

# आयएमएस विद्यार्थ्यांचा पुढाकार : जर्मनीस्थित माजी विद्यार्थ्याशी ऑनलाईन संवादातून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वेध

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** येथील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड करिअर डेव्हलपमेंट हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेले एक प्रतिष्ठित शिक्षणसंस्थान आहे. येथे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर व्यावसायिक कौशल्ये, संशोधनवृत्ती आणि नवोन्मेषी दृष्टिकोन विकसित करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. दरवर्षी संस्थेच्या वतीने प्रकाशित होणारे महाविद्यालयीन रिफ्लेक्शन मासिक हे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, विचारशक्ती आणि यशस्वी वाटचालीचे प्रभावी माध्यम ठरते. यावर्षीच्या रिफ्लेक्शन या मासिकासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता हा अत्यंत समकालीन आणि महत्त्वाचा विषय निवडण्यात आला आहे.

आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता विविध क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. उद्योग, शिक्षण, आरोग्य, वाहतूक आणि संप्रेषण या सर्वच क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाचा वेगाने विस्तार होत असून, भविष्यातील विकासाचा हा एक महत्त्वाचा पाया मानला जात आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना या क्षेत्राची सखोल माहिती मिळावी, तसेच त्यांना योग्य दिशा मिळावी या उद्देशाने मासिक समितीने तज्ज्ञ व्यक्तीची मुलाखत घेण्याचा उपक्रम राबविला.

या अनुषंगाने, संस्थेचे माजी विद्यार्थी आणि सध्या जर्मनीमध्ये कार्यरत असलेले कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील अभ्यासू श्री. पुष्कर सांगळे यांच्याशी ऑनलाईन माध्यमातून विशेष संवाद साधण्यात आला. श्री. सांगळे हे एक अनुभवी असून त्यांनी मर्सिडीज-बेंझमध्ये कार्य करताना अत्याधुनिक मल्टिमोडल व्हॉईस प्रणालींच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. ऑटोमॅटिक स्पीच रेकग्निशन (), नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग (), वेक-वर्ड डिटेक्शन आणि मल्टी-इंटिग्रेशन यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानांमध्ये त्यांना विशेष प्राविण्य आहे.

शैक्षणिक कारकिर्दीबाबत बोलायचे झाल्यास, त्यांनी आयएमएस अहिल्यानगर येथून एमसीए पदवी संपादन केली असून, त्यापूर्वी न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथून विज्ञान शाखेची पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या प्रवासात त्यांनी आणि यांसारख्या नामांकित संस्थांमध्ये कार्य करत विविध अनुभव मिळवले आहेत.

ही मुलाखत ऑनलाईन पद्धतीने पार पडली असून, विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेतील करिअर संधी, उद्योगांवरील प्रभाव, रोजगारातील बदल, साधनांचा वाढता वापर, तसेच या क्षेत्रातील भविष्यातील संधी यांसारख्या विविध पैलूंवर आधारित प्रश्न विचारले. याशिवाय भारत आणि जर्मनीतील कार्यसंस्कृतीतील फरक आणि जागतिक स्तरावरील अनुभवांवरही सखोल चर्चा करण्यात आली.

या मुलाखतीत श्री. सांगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नमूद केले की, कृत्रिम बुद्धिमत्ता ही केवळ तांत्रिक संकल्पना नसून ती उद्योगांच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणणारी शक्ती आहे. मुळे अनेक प्रक्रिया अधिक जलद आणि परिणामकारक झाल्या असून, नवीन रोजगार संधी निर्माण होत आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना सतत शिकण्याची सवय, जिज्ञासा आणि तांत्रिक कौशल्ये विकसित करण्याचे महत्त्व पटवून दिले.

संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. डॉ .मनोज कुलकर्णी आणि डॉ अंजली वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ही मुलाखत अत्यंत प्रभावीपणे पार पाडली.

मुलाखत घेणारे विद्यार्थी रिफ्लेक्शन मासिक समिती सदस्य):

सिद्धी गांधी (एमबीए द्वितीय वर्ष) खुशबू भाटिया (एमबीए प्रथम वर्ष) दिव्या चौधरी (एमबीए द्वितीय वर्ष) सृष्टी काळे (एमबीए प्रथम वर्ष) यश उधारे (एमबीए द्वितीय वर्ष) ओम पेंडुरकर (एमसीए प्रथम वर्ष) प्रफुल्ल देसले (एमसीए प्रथम वर्ष) सॅम्युअल तिवडे (एमसीए प्रथम वर्ष)

या संवादातून विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातील संधी आणि भविष्यातील दिशा याबाबत मौल्यवान मार्गदर्शन मिळाले.

# क्रिकेटमधील दव समस्येवर अहिल्यानगरच्या तिरुपती ॲग्रो इंडस्ट्रीजचा रामबाण उपाय

## आयपीएल २०२६ मध्ये ड्यूक्युअरचा डंका

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय क्रिकेट मैदानांवरील खेळाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि सामन्यांमधील पारदर्शकता टिकवण्यासाठी अहिल्यानगरच्या तिरुपती ॲग्रो इंडस्ट्रीज या कंपनीने एक क्रांतिकारी तंत्रज्ञान आणले आहे. अमेरिकेतील अत्याधुनिक ड्यूक्युअर हे तंत्रज्ञान भारतात आयात करून कंपनीने आयपीएल २०२६ आणि आगामी क्रिकेट हंगामांसाठी मैदानावरील दव समस्येवर कायमस्वरूपी तोडगा उपलब्ध करून दिला आहे. यामुळे रात्रीच्या सामन्यात मैदानावर दंव पडल्याने निर्माण होणाऱ्या समस्यांवर मात करण्यात यश आले आहे.

जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान असलेले ड्यूक्युअर हे रसायन अमेरिकेतील मेजर लीग बेसबॉल आणि गोल्फ कोर्सेसमध्ये वापरले जाते. तिरुपती ॲग्रो इंडस्ट्रीज ही या उत्पादनाची भारतातील अधिकृत आयातदार आहे.

रात्रीच्या सामन्यात मैदानावर पडणाऱ्या दवामुळे चेंडू निसरडा होतो, ज्याचा फटका गोलंदाजांना बसतो. ड्यूक्युअर गवतावर एक जलरोधक आवरण तयार करते, ज्यामुळे चेंडू दोन्ही डावात कोरडा राहतो.

या तंत्रज्ञानामुळे नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण निवडण्याचा फायदा कमी होईल आणि दोन्ही संघांना खेळाची समान संधी मिळेल.

नुकत्याच झालेल्या टि २० विश्वचषक २०२६ मध्ये मुंबईतील वानखेडे आणि चेन्नईतील चेपॉक स्टेडियमवर याचा यशस्वी प्रयोग करण्यात आला आहे. आयसीसी ने सुद्धा याची नोंद घेऊन बीसीसीआय कडून माहिती घेतल्याचे कळते. कंपनीचे संचालक रोहित खटोड आणि सुमित खटोड यांच्या नेतृत्वाखाली ही कंपनी आज अहिल्या नगरचा अभिमान बनली आहे. तिरूपती ॲग्रो इंडस्ट्रीज कंपनी बीसीसीआय आयपीएल मैदाने आणि प्रतिष्ठित कोर्सेसना आणि सर्व ठिकाणच्या लॉन साठी खते व रसायने पुरवणारी भारतातील क्रमांक १ ची स्पोर्ट्स फर्टिलायझर कंपनी बनली आहे. या तंत्रज्ञानामुळे आता क्रिकेट सामने केवळ नशिबावर (नाणेफेकीवर) अवलंबून न राहता कौशल्य आणि रणनीतीवर आधारित होतील, असा विश्वास क्रीडा तज्ञांनी व्यक्त केला आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : मो. ९४२२२२०१५८.

# बेंगळुरू येथे जळालेल्या व भाजलेल्या रुग्णांसाठी मोफत प्लास्टिक सर्जरी

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** बेंगळुरू येथे जळालेल्या व भाजलेल्या रुग्णांसाठी मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. गॅस स्फोट, ॲसिड हल्ले, घरगुती स्फोट, विजेचा धक्का तसेच इतर अपघातांमध्ये भाजलेल्या रुग्णांच्या जीवनात नवसंजीवनी देण्यासाठी (अमेरिका) या संस्थेमार्फत तज्ञ डॉक्टरांची टीम या शिबिरात मोफत शस्त्रक्रिया करणार आहे, अशी माहिती भारतीय जैन संघटनेचे श्री. शशिकांत मुनोत यांनी दिली.

बेंगळुरू येथील या संस्थेमार्फत मागील २९ वर्षांपासून अशा शिबिरांचे यशस्वी आयोजन केले जात आहे. आतापर्यंत ४५०० हून अधिक रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

सदर शिबिरजैन हॉस्पिटल, गिरिनगर, ६ क्रॉस अवलाहल्ली, बेंगळुरू येथे आयोजित करण्यात येणार आहे. एप्रिल महिन्यात प्राथमिक नोंदणी करण्यात येईल. ११ मे रोजी तपासणी होईल आणि निवडलेल्या रुग्णांवर १२ ते २१ मे २०२६ दरम्यान मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

हे शिबिर पूर्णपणे मोफत असून रुग्ण व त्यांच्या एका सहकाऱ्यासाठी प्रवास, तपासण्या, शस्त्रक्रिया, शस्त्रक्रियेनंतर राहण्याची व्यवस्था, भोजन व औषधे यांची संपूर्ण सुविधा आयोजकांकडून उपलब्ध करून दिली जाणार आहे.

सामान्य लोकांच्या आवाक्याबाहेर असलेल्या या उपचारांचा लाभ जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

नोंदणीसाठी संपर्क: ९१४८७४१७०७ / ९८८०३०७७८०

# मराठा सेवा संघ ,संभाजी ब्रिगेड , जिजाऊ ब्रिग्रेड तसेच मराठा पतसंस्था यांची कार्यकारिणीची आढावा बैठक



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर मराठा सेवा संघ( दक्षिण ,उत्तर ) ,संभाजी ब्रिगेड व जिजाऊ ब्रिग्रेड यांची कार्यकारिणीची बैठक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष इंजि. पुरुषोत्तम खेडेकर इंजि. विजयकुमार घोगरे (प्रदेश अध्यक्ष) , श्री अर्जुनराव तनपुरे (जेष्ठ मार्गदर्शक ) , इंजि. बाळासाहेब शेटे , इंजि.मनोज ढोकचौल (प्रदेश संघटक ), दीपक भदाणे (विभागीय अध्यक्ष ) , इंजि.विजयकुमार ठुबे (चेरमन मराठा पतसंस्था) यांचे उपस्थितीत पार पडली.

यावेळी प्रथम जिजाऊ वंदना घेऊन त्यानंतर मराठा समाजासाठी आदर्शव्रत अशा १) स्व .अजितदादा पवार (उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य) २) स्व.शिवाजीराव कर्डीले साहेब (विधानसभा सदस्य राहुरी) ३)स्व.अरुणकाका जगताप (विधान परिषद सदस्य) ४) स्व.मधुकर वारूळकर ( संत नामदेव तुकाराम वारकरी परिषद )या मान्यवरांना शिवांजली देण्यात आली

प्रारंभी क्रांतीज्योती महात्मा फुले जयंती निमित्ताने महापुरुषांच्या प्रतिमेस पूजन करुण प्रारंभी दक्षिण जिल्हाध्यक्ष प्रवीण दहातोंडे, यांनी उपस्थितांचे स्वागत केले मराठा सेवा संघाच्या कार्यकारणीबाबत व कार्याबाबत आढावा सादर केला.

मराठा समाजातर्फे मराठा सेवा संघ स्थापना कार्य व व्याप्ती या बाबत संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांनी मराठा समाजाला एकसंघ राहून पुढील वाढचाली बाबत मार्गदर्शन केले. महिलांना आरक्षण मिळाले त्यामुळे आज समाजकारणात व राजकारणात मोठ्या प्रमाणात महिला पुढे येत आहेत ही एक समाजाच्या दृष्टीने चांगली बाब आहे. पदावर काम करताना सर्वांनी समाजासाठी राजकीय जोडे बाजूला ठेवून एकत्र आले पाहिजे. विकासात्मक भूमिका घेतली पाहिजे.

यावेळी बोलताना इंजिनिअर विजयराव घोगरे म्हणाले की मराठा सेवा संघाचा विस्तार हा आता महाराष्ट्र पुरता नाही तर भारतात आणि भारताबाहेरील साठ देशांमध्ये झाला आहे. त्यामुळे आपण कुठेही गेलं तरी समाज हा संघटित झालेला दिसत आहे. आपला स्वतःचा विकास करताना समाजाचा विचार करून समाजाचा विकास हा केला पाहिजे हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. आज नगर शहरात संखेच्या निम्म्याच्या वर मराठा समाजातील नगरसेवक झाले आहेत एक अभिमानास्पद बाब आहे.

यावेळी बोलताना महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, मराठा सेवा संघाने आजपर्यंत मराठा समाजाला संघटित करून एक वेगळा दृष्टिकोन समोर ठेवून विकासात्मक काम केले आहे. निश्चितच या सत्कारामुळे आम्हाला पुढे कार्य करताना स्फूर्ती मिळणार आहे.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे,माजी उपमहापौर गणेश भोसले, गीतांजली काळे, निखिल वारे, संपत बारस्कर, बाळासाहेब पवार, गणेश कवडे, अजिंक्य बोरकर,महेश तवले, दिपाली बारस्कर, मयुरी जाधव, रेवननाथ पवार, रवी बारस्कर सुजित काकडे, मनोज कोतकर , सुजय मोहिते, महेश लोंढे, अमोल येवले आदि नगरसेवकांचा यावेळी सत्कार करण्यात आला. या वेळी नगरसेवक निखिल वारे दीपाली बारस्कर बाळासाहेब पवार अजिंक्य बोरकर आदीनि आपले मनोगत व्यक्त केले व मराठा सेवा संघाच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

तसेच एमपीएससी परीक्षेतून निरीक्षक धर्मदाय आयुक्त झाल्याबद्दल वैभव इथापे, महिला समितीवर निवड झाल्याबद्दल ॲड. अनुराधा येवले, तसेच मराठा सेवा संघाचे नवनिर्वाचित दक्षिण जिल्हा प्रमुख इंजिनीयर प्रवीण दहातोंडे, उत्तर विभाग जिल्हाध्यक्ष इंजिनियर विवेक लव्हाट, जिजाऊ ब्रिगेडचे अध्यक्ष नंदिनी सोनाळे, संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष राजेश परकाळे, जिल्हा संरक्षण अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल प्रशांत गायकवाड यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे महासचिव सौरभ खेडेकर,अहिल्यानगर मराठा सेवा संघाचे श्री नितीन ढोले( खजिनदार ), श्री बापूसाहेब वराळे (कार्याध्यक्ष), श्री किशोर मरकड(समन्वयक), उपस्थित मान्यवरांचे आभार उत्तर जिल्हाध्यक्ष इंजिनिअर विवेक लव्हाट यांनी मानले.

# संविधानाचा जागर करुन भिंगारच्या मिनी मॅरेथॉनमध्ये धावले युवक-युवती

**जय भीमच्या घोषणांनी दुमदुमले वातावरण; विविध स्पर्धेत युवक-युवतींचा जोशपूर्ण सहभाग**
**बाबासाहेबांचे विचार प्रत्येकाच्या जीवनात उतरले पाहिजेत – शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भिंगार येथे मंगळवारी (दि.१४ एप्रिल) आयोजित करण्यात आलेली मिनी मॅरेथॉन स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. संविधान, समता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा जागर करत युवक-युवतींसह शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभाग घेतला.

भीम जयंती उत्सव समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलनी, भिंगार यांच्या वतीने आयोजित या उपक्रमाची सुरुवात बाबासाहेबांच्या पुतळ्यास अभिवादन करून ''जय भीम''च्या घोषणांनी झाली. संपूर्ण परिसर घोषणांनी दुमदुमून गेला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे यांनी भूषविले. यावेळी उद्योजक लॉरेन्स स्वावी, कार्यक्रमाचे संयोजक मुख्याध्यापक सुहास धीवर, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन बाबासाहेब बोडखे, बाळासाहेब पतके, कॅन्टोमेंट स्कूलचे मुख्याध्यापक संजय शिंदे, डॉ. लविना लॉरेन्स स्वामी, प्रदीप भिंगारदिवे, अध्यक्ष सिध्दांत भिंगारदिवे, प्रदीप भिंगारदिवे, धीरज भिंगारदिवे, सुमेध थोरात, आदित्य भिंगारदिवे, गौरव भिंगारदिवे, आतिश शिरोळे, सागर भिंगारदिवे, किसन शेकडे, आशाबाई धीवर, सिताबाई भिंगारदिवे, द्वारकाबाई थोरात, आशा साळवे, विमल तांबे, शशिकला भिंगारदिवे, सुनिता भिंगारदिवे आदींसह आंबेडकरी चळवळीतील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मिनी मॅरेथॉनसोबतच रांगोळी, निबंध व चित्रकला स्पर्धाही घेण्यात आल्या. या स्पर्धांनाही शालेय विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळी भिंगारमधील मुख्य रस्त्यावर मोठ्या संख्येने युवक-युवती आणि विद्यार्थी जमले होते. विविध सहा वयोगटांमध्ये स्पर्धा पार पडली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते निळा झेंडा दाखवताच स्पर्धकांनी प्रचंड उत्साहाने धाव घेतली. उत्कृष्ट नियोजन, स्वयंसेवकांचे योगदान आणि शिस्तबद्ध आयोजनामुळे ही स्पर्धा यशस्वी ठरली. स्पर्धेनंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. यावेळी चैतन्य साळवे यांनी सीए परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल आणि एमपीएससी परीक्षेद्वारे धर्मदाय आयुक्त निरीक्षकपदी नियुक्ती झालेल्या ज्योती सकट यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात सुहास धीवर म्हणाले की, भारताचे महान नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण, समता आणि स्वाभिमानाचा जो दीप प्रज्वलित केला, तो अखंड तेवत ठेवण्याची जबाबदारी आजच्या पिढीवर आहे. भीम जयंती उत्सव समितीच्या माध्यमातून मागील २१ वर्षांपासून आम्ही मिनी मॅरेथॉन, मिरवणूक आणि विविध शैक्षणिक स्पर्धा आयोजित करत आहोत. या उपक्रमांचा उद्देश केवळ उत्सव साजरा करणे नसून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणे हा आहे. आजच्या युवकांनी बाबासाहेबांचे विचार आत्मसात करून समाजात सकारात्मक बदल घडवून आणला पाहिजे. खेळ, शिक्षण आणि संस्कार यांच्या माध्यमातून सक्षम पिढी घडविणे हे आमचे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे म्हणाले की, संविधान हा आपल्या देशाचा पाया आहे आणि त्या संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रत्येकाच्या जीवनात उतरले पाहिजेत. आज भिंगारमध्ये आयोजित करण्यात आलेली ही मिनी मॅरेथॉन केवळ क्रीडा स्पर्धा नसून सामाजिक संदेश देणारा उपक्रम आहे. युवक-युवतींचा उत्स्फूर्त सहभाग पाहून भविष्यातील भारत अधिक सक्षम आणि जागरूक असेल, याची खात्री वाटते. समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित समाज घडविण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती वाढते, तसेच त्यांना योग्य दिशा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

# शहरातील भाई दयासिंहजी गुरुद्वारा येथे बैसाखी गुरपूरब उत्सव साजरा

**विविध धार्मिक सोहळ्यासाठी भाविकांची उपस्थिती; जत्था किर्तनाने श्रोते मंत्रमुग्ध**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शहरातील गुरुद्वारा भाई दयासिंहजी, गोविंदपुरा येथे मंगळवारी (दि.१४ एप्रिल) बैसाखी गुरपूरब अत्यंत भक्तीपूर्ण वातावरणात उत्साहात साजरा झाला. यावेळी गुरुद्वाऱ्यात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक सोहळ्यासाठी समाज बांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

१२ एप्रिल पासून श्री अखंड पाठ साहिबजी यांचा आरंभ करण्यात आला होता. त्याची समाप्ती मंगळवारी मोठ्या श्रद्धा आणि उत्साहात पार पडली. या पवित्र प्रसंगी हजूरी रागी भाई सुखदेव सिंहजी जत्था तसेच रागी साहेब सिंहजी (पटियालावाले) यांनी गुरुबाणी कीर्तन सादर करून संगतांना आध्यात्मिक आनंद दिला. कार्यक्रमादरम्यान मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या भाविकांनी गुरुबाणीचा लाभ घेतला. उपस्थित सर्व संगतांसाठी गुरू का लंगर आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये भक्तांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

गुरुद्वाराचे अध्यक्ष सरदार बलदेवसिंह वाही म्हणाले की, बैसाखी हा शीख पंथासाठी अत्यंत पवित्र आणि ऐतिहासिक दिवस आहे. या दिवशी संगत एकत्र येऊन गुरूंच्या शिकवणीप्रमाणे सेवा, सिमरन आणि समाजातील बंधुभाव वाढवण्याचा संकल्प करते. गुरुद्वारा भाई दयासिंहजी येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मोठ्या श्रद्धा आणि उत्साहात कार्यक्रम पार पडला. भविष्यातही समाजसेवेचे कार्य अशाच प्रकारे सुरू राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गुरुद्वारा व्यवस्थापन समिती तसेच सर्व सेवकांचे विशेष योगदान लाभले. गुरुद्वारा येथे आलेल्या भाविकांना गुरु नानक देवजी (जीएनडी) ग्रुपच्या वतीने थंडाई व फळांची सेवा देण्यात आली. शेवटी लंगरने कार्यक्रमाची सांगता झाली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्राचे महिलांना पुस्तके वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनचरित्रावरील पुस्तके महिलांना वाटप करण्यात आली. या उपक्रमाद्वारे बाबासाहेबांच्या विचारांचा घरोघरी प्रसार करण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा उपक्रम राज्य शासनाचा पुरस्कार प्राप्त तथा भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे सरचिटणीस सुनिल सकट यांच्या पुढाकाराने घेण्यात आला. बाबासाहेबांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करत समाजात समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जपणूक करण्याचे यावेळी आवाहन करण्यात आले.

समाजातील वंचित घटकांना उभारी देणारे बाबासाहेबांचे विचार आजही तितकेच महत्त्वाचे असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मार्केटयार्ड परिसरातील बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महिलांना पुस्तके वाटप करण्यात आली. या वेळी अशोक शिंदे, भाजपा शहर जिल्हा सचिव डॉ. संदिप पवार, राष्ट्रवादीचे शहर उपाध्यक्ष आनंद राठोड, मानवी हक्क अभियानचे जिल्हा संघटक अशोक भोसले, भाजपा शहर कार्यकारिणी सदस्य दीपक उमाप आदी मान्यवर उपस्थित होते.

सुनिल सकट म्हणाले की, बाबासाहेबांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले, संघर्ष केला आणि देशाला एक मजबूत संविधान दिले. बाबासाहेबांनी नेहमीच शिक्षणाला सर्वात मोठे शस्त्र मानले. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा त्यांचा संदेश आजही प्रत्येकासाठी मार्गदर्शक आहे.

# बीएसएनएलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल) कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही उत्साहात व जल्लोषात कार्यक्रम साजरा करण्यात आला. प्रश्नमंजुषा, भिमगीते आणि प्रेरणादायी भाषणांनी कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

कार्यक्रमाची सुरुवात बीएसएनएलचे महाप्रबंधक राजेंद्र चोंगड, डेप्युटी जनरल मॅनेजर विश्वनाथ वाघ, एससी-एसटी वेल्फेअर असोसिएशनचे मुख्य सल्लागार प्रदीपकुमार जाधव, डीजीएम फायनान्स झोळे साहेब, सेवा बीएसएनएलचे सचिव गजेंद्र पिसे आणि प्रशासकीय अधिकारी राहुल मोरे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान बुद्ध यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या अभिवादन कार्यक्रमासाठी गणेश जोशी, भावसार, अनंतरे, पिंपरकर, सोमनाथ जगताप, विश्वनाथ वाघ, झोळे यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाप्रबंधक राजेंद्र चोंगड यांनी आपल्या मनोगतात बाबासाहेबांचे विचार आजही जागतिक स्तरावर प्रभावी असल्याचे नमूद केले. त्यांनी विशेषतः सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जगातील सुमारे १५७ देशांमध्ये साजरी केली जाते, ही भारतासाठी अभिमानाची बाब आहे.

प्रदीपकुमार जाधव म्हणाले की, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांचा संदेश आजही समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांमुळे वंचित, शोषित घटकांना न्याय मिळाला आणि देशात मोठ्या प्रमाणात सामाजिक परिवर्तन घडून आले. बाबासाहेबांचे जीवन हे संघर्ष, जिद्द आणि शिक्षणाची प्रेरणा देणारे आहे. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन जगासमोर एक आदर्श निर्माण केला. त्यामुळे प्रत्येकाने त्यांच्या विचारांचा अंगीकार करून आपल्या जीवनात आणि समाजात सकारात्मक बदल घडवून आणणे आवश्यक आहे.

सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत बीएसएनएल कर्मचारी अशोक पारधे यांची कन्या आर्या हिने ''कुणी नाय केलं भलं ओ माय माझ्या भीमाने केलं'' तसेच ''व्हीआयपी राहणं'' ही भिमगीते सादर करून उपस्थितांना भावूक केले. शिर्डी येथील कर्मचारी पवार यांनीही भिमगीत सादर करत कार्यक्रमात रंग भरला. कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा प्रदीपकुमार जाधव यांनी घेतली. या स्पर्धेला कर्मचारी वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# सामाजिक संदेश देणाऱ्या 'पत्रावळ' लघुचित्रपटाला मानाचा सन्मान

**पारनेरच्या सुपुत्राचा यशस्वी कलाप्रवास**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील मॉडेल व्हिलेज गोरेगाव येथील सुपुत्र, लेखक- दिग्दर्शक रामदास महादेव तांबे यांनी साकारलेला 'पत्रावळ' हा लघुचित्रपट सध्या चर्चेचा विषय ठरत असून, चंद्रशेखर सांडवे प्रतिष्ठान प्रस्तुत सांस्कृतिक कलादर्पण लघुचित्रपट महोत्सव २०२६ मध्ये या चित्रपटाला 'लक्षवेधी लघुचित्रपट' हा मानाचा पुरस्कार सिने सुप्रसिद्ध अभिनेते अरुण नलावडे, जेष्ठ अभिनेते जयंत ओक आणि अभिनेते सुचित जाधव यांच्या हस्ते पारितोषिक मिळाले आहे. त्यांच्या या यशामुळे पारनेर तालुक्याच्या कला व सांस्कृतिक क्षेत्राच्या यशात मोठी भर पडली आहे.

'पत्रावळ' हा लघुचित्रपट केवळ एक कलाकृती नसून ग्रामीण वास्तव, सामाजिक जाणीवा आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यांचा संगम घडवण्यासाठी केलेला प्रभावी प्रयत्न आहे. एका साध्या, अशिक्षित पण निसर्गप्रेमी व्यक्तीच्या आयुष्याभोवती फिरणारी ही कथा समाजाला अंतर्मुख करणारी आहे. गावोगावी फिरत विविध समारंभात वापरल्या जाणाऱ्या पानांपासून तयार




**रामदास तांबे यांचे यश हे केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण पारनेर तालुक्याचा अभिमान आहे. ग्रामीण भागातील तरुणांनी आपल्या कलेच्या जोरावर मोठ्या व्यासपीठावर पोहोचणे ही अत्यंत प्रेरणादायी बाब आहे. 'पत्रावळ'सारख्या लघुचित्रपटातून सामाजिक जाणीवा जागृत करण्याचा प्रयत्न दिसून येतो, ही कौतुकास्पद गोष्ट आहे. आजच्या डिजिटल युगात लघुचित्रपट हे प्रभावी माध्यम बनले आहे. अशा माध्यमातून समाजाला योग्य दिशा देणारे विचार मांडणाऱ्या तरुणांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. रामदास तांबे यांनी भविष्यातही असेच दर्जेदार आणि आशयघन चित्रपट साकारावेत, यासाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा.**

**आमदार काशिनाथ दाते सर**
**(विधानसभा सदस्य)**

होणाऱ्या पत्रावळींचा व्यवसाय करताना तो व्यक्ती केवळ उदरनिर्वाह करत नाही, तर नकळत पर्यावरण रक्षणाचे मोठे कार्य करत असतो, हा या चित्रपटाचा गाभा आहे. प्रमुख भूमिका डॉ. सुरेश शिंदे,सहाय्यक भूमिका डॉ. वर्षा बांडे, राहुल बरडे, ध्वनी किरण गावडे संकलन अमेय गावडे, छायाचित्रण सोमेश थोरात, ग्राफिक्स वैष्णवी तांबे, लेखन दिग्दर्शन रामदास तांबे निर्माता किरण गावडे, रामदास तांबे, सौजन्य माळकूप आणि भाळवणी ग्रामस्थ यांचे आहे.

या कथानकातून आजच्या आधुनिक आणि यांत्रिकीकरणाच्या युगात हरवत चाललेली साधी जीवनशैली, निसर्गाशी असलेले नाते आणि समाजासाठी निस्वार्थ भावनेतून केले जाणारे छोटेसे कार्य किती मोठा परिणाम घडवू शकते, याचे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे. प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम आणि त्यावर पर्याय म्हणून पारंपरिकता जपत वापरल्या जाणाऱ्या 'पत्रावळ'सारख्या साधनांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या लघुचित्रपटात कोणत्याही कृत्रिम तांत्रिक साधनांचा अतिरेक न करता, नैसर्गिक अभिनय, वास्तवदर्शी चित्रण आणि प्रभावी पार्श्वसंगीताच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत थेट पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे ही कलाकृती अधिक वास्तववादी आणि हृदयस्पर्शी ठरते.

# तमाशा कलावंतांवरील मारहाण : परंपरेच्या पवित्र रंगमंचावरचा काळा डाग

गावोगावी वर्षातून एकदा येणारी यात्रा म्हणजे केवळ धार्मिक सोहळा नसून, ती गावाच्या एकतेचा, आनंदाचा आणि परंपरेचा उत्सव असतो. प्रत्येक घरातून वर्गणी गोळा केली जाते गावच्या भाषेत ''कंबरेचा करगुटा आणि घराचा उंबरा'' यावर ठरलेली ही वर्गणी म्हणजे गावकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा भाग असतो. या सर्व आटापिट्यानंतर यात्रा अगदी दौलतीत साजरी केली जाते.

या यात्रेत संध्याकाळच्या वेळेस तमाशा, नाटक किंवा ऑर्केस्ट्रा ठेवला जातो. हा केवळ मनोरंजनाचा भाग नसून, तो गावकऱ्यांसाठी वर्षभराच्या कष्टानंतर मिळालेला विरंगुळाएक ''हाऊस'' असतो. ढोलकीचा ठेका, लावणीचा साज आणि रंगमंचावरची जिवंत कला यामुळे वातावरण भारून जाते.

मात्र, अलीकडच्या काळात या आनंदोत्सवावरच काळी छाया पडताना दिसते. वडगाव सावताळ, पारनेर आणि संगमनेर तालुक्यातील काही गावांमध्ये तमाशा सुरू असताना काही प्रेक्षकांकडून गैरवर्तन, शिवीगाळ आणि अगदी कलावंतांवर मारहाण करण्याचे प्रकार घडले आहेत. ही बाब अत्यंत निंदनीय आणि संतापजनक आहे.

तमाशा कलावंत कोण आहेत? तेही आपल्यासारखेच कष्टकरी माणसं आहेत. रात्रंदिवस गावोगावी फिरून ते आपली कला सादर करतात आणि त्यातून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांची मेहनत, त्यांचे कौशल्य आणि त्यांची कला ही आपल्या लोकसंस्कृतीची ओळख आहे. अशा कलाकारांवर हात उचलणे म्हणजे त्यांच्या कलेचा नव्हे, तर आपल्या संस्कृतीचाच अपमान होय.

यात्रा हा सण आहे तो हाणामारीचा मैदान नाही. काही मोजक्या लोकांच्या चुकीच्या वागणुकीमुळे संपूर्ण गावाची बदनामी होते. उद्या हेच कलाकार गावात येणं टाळतील, आणि हळूहळू ही परंपराच लोप पावेल. आपण स्वतःच आपल्या संस्कृतीच्या मुळावर घाव घालत आहोत, हे ओळखण्याची वेळ आली आहे.

यासाठी आयोजकांनी योग्य नियोजन, शिस्त आणि आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था ठेवणे गरजेचे आहे. गावातील ज्येष्ठांनी मार्गदर्शन करावे, तर तरुणांनी पुढे येऊन संरक्षणाची भूमिका निभावली पाहिजे. गावात येणारे कलाकार हे पाहुणे असतात त्यांना सन्मान आणि सुरक्षितता देणे ही प्रत्येक ग्रामस्थाची जबाबदारी आहे.

आज गरज आहे ती मानसिकता बदलण्याची. तमाशा हा केवळ करमणुकीचा भाग नाही, तर तो आपल्या संस्कृतीचा जिवंत वारसा आहे. गावोगावी बदल घडला पाहिजे कलाकारांवर हात उचलणाऱ्यांना विरोध झाला पाहिजे आणि अशा प्रकारांना त्वरित आळा बसला पाहिजे.

शेवटी एकच प्रश्न...
आपण यात्रा साजरी करतोय की आपल्या संस्कृतीची अब्रू घालवत आहोत?

■ संतोष कोरडे

(पान १ वरून)

## पैठणमध्ये दोन गटांत तुफान हाणामारी; खाटीक वाडा परिसरात तणावाचे वातावरण

जोरदार धक्काबुक्की व मारामारी झाली. काही  एक जण गंभीर  जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त करत, ''जोपर्यंत संबंधितांवर कठोर कारवाई केली जाणार नाही, तोपर्यंत अशा प्रकारच्या घटना थांबणार नाहीत,'' अशी प्रतिक्रिया दिली आहे.
दरम्यान, पोलीस प्रशासनाने या घटनेची दखल घेतली असून संबंधितांवर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस निरीक्षकांनी ठोस आणि कठोर पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## शेअर बाजारात उसळी, गुंतवणूकदार मालामाल

म्हणजेच गुंतवणूकदारांनी एका दिवसात ९११६२८. ७८ लाख कोटी रुपयांची कमाई केली आहे.
भारतीय शेअर बाजारात लार्ज कॅप, स्मॉल कॅप आणि मिड कॅप स्टॉक्समध्ये खरेदी पाहायला मिळाली. निफ्टी स्मॉलकॅप १०० आणि निफ्टी मिडकॅप १०० मध्ये २ टक्क्यांपेक्षा अधिक तेजी दिसून आली.
सेन्सेक्सवर आज १२६३.६७ अंकांची तेजी दिसून आली. दुपारी साडे तीन वाजता बाजार बंद झाला तेव्हा सेन्सेक्स ७८११४.२४ अंकांवर बंद झाला. तर, निफ्टी ५० निर्देशांक ३८८.६५ अंकांनी वधारुन २४२३१.३० अंकांवर बंद झाला.

## पैठण-शेवगाव मार्गावरील 'ब्लॅक स्पॉट'वर प्रशासनाची नजर; अपघात रोखण्यासाठी संयुक्त पाहणी

पथकाने पैठण शहरासह पाटेगाव, चनकवाडी, तेलवाडी आणि सोनवाडी शिवार परिसरातील प्रमुख वळणे व अपघात प्रवण ठिकाणांची बारकाईने तपासणी केली.
तातडीच्या उपाययोजना सुचविल्या पाहणीदरम्यान रस्त्यावरील त्रुटी, दिशादर्शक फलकांचा अभाव आणि धोकादायक वळणांवर विशेष चर्चा झाली. अपघात रोखण्यासाठी रंबल स्ट्रिप्स ( ), गतिरोधक, रिफ्लेक्टर आणि सूचना फलक बसवण्याच्या सूचना देण्यात आल्या.
लेखी आदेश, त्वरित अंमलबजावणीचा इशारा
या संदर्भात पोलीस विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाला लेखी पत्र देण्यात आले असून, आवश्यक उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
नागरिकांनाही आवाहन
सुरक्षित वाहतुकीसाठी वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.